संदर्भ क्र.: एमएमसीसी/ पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना /२०२४-२५/ 179 ०५/०९/२०२४

# नोटीस

## पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सन २०२४-२०२५ वर्षाकरिता भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजासाठी ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरणेबाबत........

सर्व उच्च शिक्षण घेणाऱ्या भटक्या जमाती - क प्रवर्गातील धनगर समाजासाठी प्रवर्गातील पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना सन २०२४-२०२५ ऑफलाईन पद्धतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया चालू झालेली असून, सोबत जोडलेल्या परिपत्रकामधे ऑफलाईन अर्ज उपलब्ध आहे. सदर योजना हि जे विद्यार्थी हे स्थनिक रहिवासी नसून खाजगी वसतिगृहात अथवा भाड्यानी राहत आहेत व ज्यांचे कौटुंबिक उत्पन्न हे रुपये २,५०,०००/- किंवा त्यापेक्षा कमी आहे अश्या करिताच आहे.

वर नमूद केलेला योजनेचा अर्ज ऑफलाईनपद्धतीने संपूर्ण भरून **दिनांक ३० सप्टेंबर, २०२४** पर्यंत समाज कल्याण कार्यालय, विश्रांतवाडी, पुणे या कार्यालयात सोबत ऑफलाईन परिपूर्ण भरलेला अर्ज अर्ज व शासन निर्णयामध्ये नमूद असलेल्या कागदपत्रांसोबत जमा करावा.

जे विद्यार्थी या योजनेचा लाभ घेतील ती इतर कुठल्याही वसतिगृह निर्वाह भत्त्याचा लाभ घेऊ शकणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी

Harshala

**श्रीमती. हर्षला वाडकर**
प्रशासन अधिकारी

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

**डॉ. देविदास गोल्हार**
प्राचार्य

प्रंत: १. सर्व शाखा प्रमुखांना विद्यार्थ्यांना सूचित करण्यासाठी

सोबत: पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा ऑफलाईन अर्ज व योजेनच्या पात्रता व लाभ याच्या मार्गदर्शनासाठी इतर मागास बहुजन कल्याण शासन निर्णय क्रमांक: स्वयंम २०२३/प्र.क्र. ३६८/योजना -२ दिनांक २१/०६/२०२४

# पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनासाठी सन ---------- वर्षाकरिता इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती,आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

**(भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजासाठी)**

| अर्जदाराचा फोटो |
|---|

**आवेदन पत्र भरण्यापूर्वी ते काळजीपूर्वक वाचुन भरावे**

| कार्यालयाने भरावयाची माहिती | | | |
|---|---|---|---|
| आवदेनपत्र आवक क्रमांक | गुणवत्ता यादीतील क्रमांक | गुण | टक्केवारी |
| | | एकूण गुण ................<br>मिळालेले गुण ............. | |

**प्रति,**
**सहाय्यक संचालक,**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग ,**
...............................
**महोदय / महोदया,**

मी **पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम** योजनेचा लाभ मिळणेसाठी माझे आवदेन पत्र सादर करीत आहे. आवदेनपत्रात नमुद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार खरी आहे.मी सदर योजनेच्या सर्व अटी व शर्ती पूर्णपणे वाचलेल्या असून त्या मला अवगत झाल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळाल्यास मी सदर योजनेसाठी लागु असलेल्या नियमांचे /अटींचे कसोशिने पालन करीन अशी मी हमी देत आहे.

मी खोटी माहिती वा कागदपत्रे देऊन लाभ घेतल्यास किंवा शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करीत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास मी कारवाईस पात्र राहील. तसेच सदर अंतर्गत मला मिळालेली रक्कम (१२टक्के) व्याजासह शासनास परत करेन याची मला जाणीव आहे.

स्थळ :- आपला/आपली विश्वासू

दिनांक :- (अर्जदाराची स्वाक्षरी)

अर्जदाराचे नाव ..............................
मोबाईल क्रमाांक .............................
आधार क्रमांक ................................

# पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम  योजनाकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना

| | |
|---|---|
| **अर्जदाराची माहिती** | |
| अ) १) अर्जदार विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव - आडनाव ……………………..स्वत: चे नांव ………………………<br>वडिलांचे नांव…………… | |
| २) वडिलांचे संपूर्ण नांव: - आडनाव ……………. स्वत: चे नांव …………………वडिलांचे नांव…………… | |
| ३) अर्जदार विद्यार्थिनी नवविवाहित असेल तर पतीचे नाव व<br>पत्ता: - | |
| ४) आईचे पूर्ण नाव: - | |
| ५) जात व प्रवर्ग: | जन्म दिनांक :- ………………… वय:-………………. |
| ६) (i) अर्जदाराचे मूळ राहण्याचे ठिकाण व पत्र व्यवहाराचा पूर्ण पत्ता (पिनकोडसह) | घर क्रमांक …………. रस्ता/गल्ली ………………………..<br>जवळची खूण ……………… गाव/शहर ………………….<br>तालुका ………………… जिल्हा ……………………………<br>पिन क्रमांक ………………………….. |
| (ii) उपविभागीय अधिकारी / उपजिल्हाधिकारी यांनी दिलेला रहिवासी दाखला | प्रमाणपत्र क्रमांक …………………………………<br>दिनांक ……………………..<br>कार्यालयाचे नाव:……………………………………………. |
| ७) अर्जदाराचा मोबाईल क्रमांक<br>असल्यास दूरध्वनी क्रमांक (एसटीडी कोडसह) | ……………………………………<br>…………………………………… |
| ८) अर्जदार दिव्यांग आहे काय?<br>दिव्यांगत्वाचा प्रकार<br>टक्केवारी | …………………………………<br>…………………………………<br>………………………………… |
| **ब) जातीच्या दाखल्याचा तपशील :-** | |
| (i) अर्जदाराने ज्या जिल्ह्यातून जातीचा  दाखला काढला आहे त्या जिल्ह्याचे नांव<br>(ii) इमाव, विजाभज व विमाप्र असल्याबाबतचे उपविभागीय अधिकारी/ उपजिल्हाधिकारी यांनी  दिलेल्या जात प्रमाणपत्रातील माहिती | ………………………………<br>प्रमाणपत्र क्रमांक …………………<br>जारी केल्याचा दिनांक ………………<br>जात ……………………….<br>गांव ……………………………<br>तालुका ……………………<br>जिल्हा……………………… |

| | |
|---|---|
| **क) आधार कार्डचा तपशील :** | |
| (i) अर्जदाराचा आधार कार्ड क्रमांक | |
| (ii) आधारकार्ड वरील पत्ता | |
| **ड) बँकेचा तपशील:** | |
| (१) राष्ट्रीयकृत बँकेचे नांव | |
| (२) शाखा | |
| (३) खाते क्रमांक | |
| (४) I.F.S.C. कोड | |
| (५) बँक खाते आधारकार्डाशी सलंग्न केल्याचा पुरावा | |
| **इ) प्रवेशित महाविद्यालयाची माहिती: –** | |
| १) ज्या महाविद्यालयात विद्यार्थ्याने प्रवेश घेतला आहे त्या महाविद्यालयाचे नाव | |
| २) महाविद्यालयाचा पत्ता | |
| ३) महाविद्यालयाने विद्यार्थ्यास दिलेला प्रवशे नोंदणी क्रमांक / ओळखपत्र क्रमांक | |
| **फ) प्रवेशित अभ्यासक्रमाची माहिती: –** | |
| १) अभ्यासक्रमाचे नाव | |
| २) प्रवेशित वर्ष | (पहिले / दुसरे/ तिसरे/ चौथे/पाचवे) |
| ३) प्रवेश दिनांक व वर्ष | |
| ४) अभ्यासक्रमाचा कालावधी (किती वर्षाचा अभ्यासक्रम) | |
| ५) अभ्यासक्रम- पदवी/ पदव्युत्तर (इतर असल्यास नोंद करावे) | |
| **ग) गुणाची टक्केवारी: –** | |

| | प्रवेश वर्ष | उत्तीर्ण महिना व वर्ष | एकूण गुण | एकूण पैकी प्राप्त गुण | गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| इयत्ता १२ वी | | | | | |
| पदवी | | | | | |

टिप: १) गुणांच्या ऐवजी ग्रेडेशन असल्यास ग्रेडेशन नुसार येणारी टक्के वारी द्यावी.
२) जे लागू नसेल ते खोडावे

| | |
|---|---|
| **ह)** (i)अर्जदाराने देय असणाऱ्या शिष्यवृत्ती/ शैक्षणिक परीक्षा फी/विद्यावेतन या योजनेचा लाभ घेतला आहे का? | होय/नाही |
| (ii) घेतला असल्यास त्याचा शिष्यवृत्ती अर्ज क्रमांक | |

**अर्जदाराच्या पालकांची माहिती :**

| | |
|---|---|
| १) पालकांचे पूर्ण नाव | |
| २) पालकाचे अर्जदाराशी नाते | |
| ३) वडील जिवीत नसल्यास त्यांचे मृत्यूचे प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी | |
| ४) पालकांचा व्यवसाय. | |
| ५) जेथे व्यवसाय करतात तेथील पत्रव्यवहाराचा पत्ता. | |
| ६) पालकांचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न. (तहसीलदार यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा जेथे सेवा करीत असतील तेथील कार्यालय प्रमुखाने प्रमाणित केलेल्या वार्षषक वेतन प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.) | रुपये.............................. वर्ष................................. |

मी दिलेली माहिती खोटी आढळल्यास किंवा माझ्या पाल्याने शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करीत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास माझ्या पाल्यास सदर योजनेचा मिळत असलेला लाभ रदद होईल, याची तसेच अशा प्रकरणी सदर योजनेंतर्गत माझ्या पाल्यास मिळालेली रक्कम १२टक्के व्याजासह मी शासनास परत करीन अशी लेखी हमी देत आहे.

**स्थळ:...................**

**दिनांक:................**

**साक्षीदार-**
**नांव:-**
१)................................स्वाक्षरी.............

२) ............................... स्वाक्षरी ................

पालकाची स्वाक्षरी

# पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या अर्जासाठी शैक्षणिक संस्थेने द्यावयाची माहिती

| | |
|---|---|
| अ) १) विद्यार्थ्याचे नाव | |
| २) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेल्या शैक्षणिक संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता | |
| ३) महाविद्यालय कोणत्या विद्यापीठाशी सलंग्न आहे | |
| ४) अर्जदाराने आपल्या महाविद्यालयात कोणत्या अभ्यासक्रमास प्रवशे घेतलेला आहे त्या अभ्यासक्रमाचे नाव व त्याचा कालावधी | |
| ५) महाविद्यालयास सक्षम प्राधिकाऱ्याने मान्यता दिलेल्या आदेशाचा क्रमाांक व दिनांक | |
| ६) महाविद्यालयाचा पत्ता | |
| ७) महाविद्यालय व्यवस्थापन प्रकार (शासकीय/शासन अनुदानित/खाजगी अनुदानित/ खाजगी विनाआनुदानीत/ स्वयंअर्थसहाय्यीत/ अभिमत इत्यादी नोंद करावी) | |
| ८) महाविद्यालयाचा कोड क्रमांक | |
| ९) विद्यार्थ्याचा प्रवशे नोंदणी क्रमांक / जनरल रजिस्टर नोंदणी क्रमांक | |
| **ब) विद्यार्थांच्या प्रवशोबाबतची माहिती: –** | |
| (१) अभ्यासक्रमाचे नांव | |
| (२) प्रवेशित वर्ष (सदरचा विद्यार्थी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा) | (पहले/ दुसरे/ तिसरे/चौथे) |
| (३) प्रवेश दिनांक व वर्ष | |
| (४) अभ्यासक्रमाचा कालावधी (पदवी/पदव्युत्तर) (किती वर्षाचा अभ्यासक्रम) | |
| (५) व्यवसायिक/ बिगर व्यवसायिक | |
| (६) प्रकार- (अनुदानित/ विनाअनुदानीत) | |
| (७) अभ्यासक्रम- (पदवी/पदविका/ पदव्युत्तर) (इतर असल्यास नोंद करावी) | |
| (८) आपल्या महाविद्यालयात प्रवशे घेताना अर्जदाराने सादर केलेल्या गुणपत्रिकेनुसार त्यास इयत्ता १० वी/१२ वी/पदविका/पदवी/परीक्षेत मिळालेले एकूण गुण व टक्केवारी (१२ वी ६०% गुण आवश्यक) | इयत्ता १२ वी चे गुण ................ टक्केवारी ......... पदवीचे गुण .......................... टक्केवारी ......... |

| | |
|---|---|
| (९) अर्जदाराने आपल्या महाविद्यालयात आणखी कोणत्या शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर केला आहे. असल्यास त्याचा अर्ज क्रमांक (MAHADBT चा अर्ज क्रमांक) | |
| (१०) अर्जदाराने आपल्या संस्थेत प्रवशे घेण्यापूर्वी कोणत्या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेतले होते त्याची माहिती | |
| (११) अर्जदाराने कोणत्या कोट्यातून प्रवशे घेतला. ((मॅनेजमेंट कोटा, CAP, स्पॉन्सर्ड कोटा,FWS (Fee Waiver Scheme), इतर (नमूद करणे) | |
| (१२) विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या/तालुक्याच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवाशी नसावा. | |

स्थळ: ..............................

दिनांक : ...........................

शिक्का

मुख्याधापक/प्राचार्य स्वाक्षरी

**पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या अर्जासाठी सोबत खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती जोडाव्यात ( मुळ प्रमाणपत्र जोडू नये )**

| | |
|---|---|
| १) सक्षम अधिकाऱ्याने दिलेला इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गाचा) जातीचा दाखला | होय / नाही |
| २) महाराष्ट्राचा रहिवाशी असल्याचा पुरावा ( वय /अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र / रेशन कार्ड/ जन्म तारखेचा दाखला / शाळा सोडल्याचा दाखला यापकैी एक ) | होय / नाही |
| ३) आधार कार्डची प्रत | होय / नाही |
| ४) राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडल्याचा पुरावा म्हणनू पासबकुच्या पहिल्या पानाची प्रत किंवा बँक स्टेटमेंटची प्रत किंवा रद्द केलेला चेक. | होय / नाही |
| ५) तहसीलदारापेक्षा कमी दर्जा नसलेल्या महसूल अधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र किंवा वडील नौकरीत असल्यास फॉर्म नं.१६ | होय / नाही |
| ६)अनाथ प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाकडील प्राधिकाऱ्याचे अनाथ प्रमाणपत्र अनिवार्य आहे. | |
| ७) विद्यार्थी दिव्यांग असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र | होय / नाही |
| ८) इ. १० वी, १२ वी किंवा पदवी परीक्षेचे गणुपत्रक | होय / नाही |
| ९) महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र | होय / नाही |
| १०) विद्यार्थिनी विवाहित असल्यास पतीच्या उत्पन्नाचा पुरावा | होय / नाही |
| ११) बँक खाते आधार क्रक्रमांकाशी सलंग्न केल्याबाबतचा पुरावा | होय / नाही |
| १२) विद्यार्थ्याने कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवशे घेतला नसल्याबाबतच शपथपत्र | होय / नाही |
| १३) स्थानिक रहिवाशी नसल्याबाबतचे प्रमाणपत्र | होय / नाही |
| १४) विद्यार्थी सध्या जेथे राहतो त्याबाबतचा पुरावा (खाजगी वसनतगृह, भाडे करारनामा इ.) | होय / नाही |
| १५) महाविद्यालयाची उपस्थिती प्रमाणपत्र | होय / नाही |
| १६) सत्र परीक्षेच्या निकालाची प्रत | होय / नाही |
| १७) महाविद्यालय सोडल्याचे प्रमाणपत्र (T.C.) | |
| १८) प्रवेश घेतलेली पावती | |
| १९)व्यवसायिक अभ्यासक्रमात प्रवेश असेल तर cap id/Allotment letter जोडणे (शासकीय कोट्यातून प्रवेशित असले पाहिजे.) | |

अर्जदाराची स्वाक्षरी

अर्जदाराचे पूर्ण नाव ............................................

मोबाईल क्रमांक...................................

## R.T.G.S. साठी विद्यार्थ्यांनी भरुन द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना

| | | |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्याचे नांव<br>(खाते पुस्तकानुसार) | |
| २ | बँकेचे नाव | |
| ३ | शाखेचे ठिकाण | |
| ४ | बँक खाते क्रमांक | |
| ५ | IFSC CODE | |
| ६ | MICR CODE | |
| (सोबत: - बँक खाते पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स अथवा रद्द केलेला स्वाक्षांकित धनादेश जोडावा.) | | |

# मुलभूत पात्रता

१. विद्यार्थी वसतीगृह प्रवेशास पात्र असावा.

२. विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

३. अनाथ प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाकडील प्राधिकाऱ्याचे अनाथ प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

४. दिव्यांग प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे४०% पेक्षा जास्त दिव्यान असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

५. विद्यार्थ्यांच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रीकोत्तर उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षिक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

६. विद्यार्थ्याने स्वत:चा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी सलंग करणे बंधनकारक राहील.

७. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या/तालुक्याच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवाशी नसावा.

## शैक्षणिक पात्रता

१. सदरचा विद्यार्थी १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.

२. व्यवसायिक तसेच बिगरव्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यास सदर योजनेसाठी अर्ज करताना किमान ६० टक्के किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन/ CGPAचे गुण असणे आवश्यक राहील.

३. व्यवसायिक तसेच बिगरव्यवसायिक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार त्या संबधित प्रवर्गातून प्रवेश देण्यात येतील. यासाठी इयत्ता १२ वी च्या गुणांची टक्केवारी विचारात घेतली जाईल.

४. सदर योजनेअंतर्गत एकूण प्रवेश सांख्येच्या ७० % जागा व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी व ३० % जागा बिगर व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यासाठी असतील.

५. निवडलेला विद्यार्थी संबधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत पात्र राहील

६. एका शाखेची पदवी किंवा पदवयुत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानांतर पुन्हा इतर शाखेच्या पदवी किंवा पदवयुत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

७. योजनेंतर्गत लाभ मिळविण्याकरिता विद्यार्थ्याची महाविद्यालयीन उपस्थिती किमान ७५% असावी. तथापि, एखाद्या विद्यार्थ्याच्या उपस्थितीबाबत शंका निर्माण झाल्यास संबधित महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्याच्या उपस्थितीबाबत शहानिशा करून विद्यार्थ्यास देय असलेली रक्कम अदा करण्याबाबत संबधित सहायक सांचालक (इतर मागास बहुजन कल्याण ) कार्यालयाकडून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

८. निवड करण्यात आलेला विद्यार्थी संबधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. मात्र विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या त्या अभ्यासक्रमाच्या परीक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

## योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे:-

१) भाडयाने राहत असल्याबाबत व स्थानिक रहिवाशी नसल्याचे प्रतिज्ञापत्र (नोटरी)

२) स्वयंघोषणापत्र (दिलेली माहिती खरी व अचुक असल्याबाबत)

३) कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र

४) भाडयाने राहत असल्याबाबतचे भाडे चिठ्ठी व भाडेकरारपत्र / करारनामा

५) महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा पुरावा

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांकरिता पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना लागू करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्र : स्वयंम-२०२३/प्र.क्र.३६८/योजना-२**
३ रा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- २१ जून, २०२४

**वाचा :** (१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र.आवगृ-२०१६/प्र.क्र.८७/कार्या-१२, दि. २७.११.२०१८

(२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.बीसीएच-२०१६/ प्र.क्र.२९३/ शिक्षण-२, दि. ६/०१/२०१७

(३) शासन निर्णय, इमाव, सावशैमाप्र, विजाभज, कल्याण विभाग, क्र.धवगृ-२०१९/ प्र.क्र.१२६/ मावक, दि. ०६/०९/२०१९ .

(४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.सान्यावि-२०२३/ प्र.क्र.६०(४) बांधकामे, दि. ३०.१०.२०२३.

(५) शासन निर्णय, इतर मागास बहूजन कल्याण विभाग, क्र.वगृयो-२०२२ /प्र.क्र.११/ योजना-५, दि.१३.१२.२०२३.

(६) अ.मु.स (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली दि.०५.०४.२०२४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :-**

आदिवासी विकास विभागाच्या पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेच्या धर्तीवर, वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाच्या विदयार्थ्यांकरिता पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना राबविण्यास संदर्भाधिन वाचा क्र.०३ येथे नमुद दि.०६.०९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

२. मा.मंत्रीमंडळाच्या दि.१९.१०.२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे, वसतिगृहाच्या लाभापासून वंचित असलेल्या विदयार्थ्यांकरिता लागू असलेल्या विविध प्रकारच्या योजनांमध्ये तसेच यापुढे प्रस्तावित करण्यात येणाऱ्या योजनांमध्ये एकसमानता रहावी यासाठी सर्वंकष धोरण निश्चित करण्याबाबतचा निर्णय संदर्भाधिन क्र.०४ येथे नमुद दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे.

३. सदर शासन निर्णयातील निदेश लक्षात घेवून या विभागाच्या संदर्भ क्र.०३ येथे नमुद दि.०६.०९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आलेल्या "पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना" या योजनेकरिता निश्चित केलेल्या निकषामध्ये एकसमानता यावी याकरिता सुधारित प्रस्ताव मा.अ.मु.स (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली दि.०५.०४.२०२४ रोजी आयोजित बैठकीमध्ये सादर करण्यात आला. सदर बैठकीमध्ये धनगर समाजातील विद्यार्थ्यांकरीता स्वयंम योजनेच्या अनुषंगाने प्रस्तावित केलेले निकष हे विभागाने अर्थसंकल्पीय तरतुद विचारात घेऊन सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने निर्गमित केलेल्या दि.३०.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार विभागाच्या स्तरावर अंतिम करावेत असा निर्णय घेण्यात आला आहे.

४. त्यानुसार, वसतिगृहाच्या लाभापासून वंचित असलेल्या विदयार्थ्यांकरिता विविध विभागामार्फत सुरू असलेल्या योजनेमधील निकष विचारात घेवून या विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या -पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना॰ या योजनेच्या निकषामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्यानुषंगाने, या विभागाचा संदर्भाधिन क्र.३ येथे नमुद दि.६/९/२०१९ चा शासन निर्णय अधिक्रमित करून शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या परंतु, शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेश न मिळालेल्या भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांना "पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना" राबविण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

सदर योजनेंतर्गत प्रती जिल्हा ६०० याप्रमाणे एकूण २१,६०० विदयार्थ्यांना प्रति वर्षी लाभ देण्यात येईल. त्याकरिता लाभार्थ्यांनी संबंधित जिल्हयातील सहायक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण यांचेकडे ऑनलाईन/ ऑफलाईन स्वरूपात अर्ज करावा.

सदरहू योजनेंतर्गत भोजन, निवास व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घेण्यासाठी खालीलप्रमाणे निश्चित केल्यानुसार, पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न असलेल्या राष्ट्रीयीकृत बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरित करण्यात येईल.

| अ. क्र | खर्चाची बाब | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी- चिंचवड, नागपूर या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | इतर महसुली विभागीय शहरातील उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्ष घेणाऱ्या विद्यार्थ्यांसा अनुज्ञेय रक्कम | इतर जिल्ह्याचे ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम | तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अनुज्ञेय रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२,००० | २८,००० | २५,००० | २३,००० |
| २ | निवास भत्ता | २०,००० | १५,००० | १२,००० | १०,००० |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,००० | ८,००० | ६,००० | ५,००० |
| | प्रती विद्यार्थी एकूण संभाव्य वार्षिक खर्च | ६०,००० | ५१,००० | ४३,००० | ३८,००० |

**२) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी खालील प्रमाणे निकष विहित करण्यात येत आहेत -**

**अ) मुलभूत पात्रता :-**

१. विद्यार्थी हा भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजाचा असावा.
२. विदयार्थी वसतीगृह प्रवेशास पात्र असावा.
३. विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
४. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला भटक्या जमाती-क प्रवर्गाचा जातीचा दाखला/ तसेच भटक्या जमाती-क प्रवर्गाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिले वैध जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

५. अनाथ प्रवर्गामधून अर्ज करणा-या विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण विभागाकडील सक्षम प्राधिका-याचे अनाथ प्रमाणपत्र आनिवार्य आहे.

६. दिव्यांग प्रवर्गामधून अर्ज करणा-या विद्यार्थ्यांना जिल्हा शल्यचिकित्सक यांचे **४०% पेक्षा** जास्त दिव्यांग असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

७. विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षीक उत्पन्न मर्यादा लागू राहील.

८. विद्यार्थ्याने स्वतःचा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संल्गन करणे बंधनकारक राहील.

९. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या/ तालुक्याच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थी रहिवाशी नसावा.

**ब) <u>शैक्षणिक निकष :-</u>**

१. सदरचा विद्यार्थी **१२** वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा .

२. व्यवसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांस सदर योजनेसाठी अर्ज करताना किमान ६० टक्के किंवा त्या प्रमाणात ग्रेडेशन/ CGPAचे गुण असणे आवश्यक राहील. जास्त प्रमाणात अर्ज प्राप्त झाल्यानंतर, इयत्ता १२ वी मध्ये प्राप्त गुणांची टक्केवारी विचारात घेतली जावी.

३. सदर योजनेंतर्गत एकूण प्रवेश संख्येच्या ७० टक्के जागा व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांसाठी व ३० टक्के जागा बिगर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांसाठी असतील.

४. या योजनेंतर्गत निवड केलेला विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पुर्ण होईपर्यत लाभास पात्र राहील.

५. केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल. तथापि, दोन वर्षापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही.

६. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अखिल भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इ. मार्फत मान्यताप्राप्त महाविद्यालयात/संस्थेमध्ये व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास प्रवेश मिळालेला असावा.

७. योजनेंतर्गत, तालुकास्तरावर लाभ मंजूर करण्यासाठी भटक्या जमाती-क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्याने इ. १२ वी नंतरच्या मान्यताप्राप्त व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयामध्ये केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेला असावा.

८. एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेच्या पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

९. निवड करण्यात आलेल्या विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील. मात्र विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या त्या अभ्यासक्रमाच्या परिक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

१०. योजनेंतर्गत लाभ मिळण्याकरिता विद्यार्थ्याची महाविद्यालयीन उपस्थिती किमान ७५% असावी. तथापि, एखाद्या विद्यार्थ्याच्या उपस्थितीबाबत शंका निर्माण झाल्यास संबंधित महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्याच्या उपस्थितीबाबत शहानिशा करून विद्यार्थ्यास देय असलेली रक्कम अदा करण्याबाबत संबंधित सहायक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण विभाग कार्यालयाकडून योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

**क) इतर निकष :-**

१. योजनेचा लाभ १२ वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास देण्यात येईल. तथापि एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त ५ वर्षे सदर योजनेचा लाभ घेता येईल.परंतु, इंजीनिअरिंग /वैदयकीय अभ्यासक्रमासाठी सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त ६ वर्ष राहील.

२. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे कमाल वय ३० वर्षापेक्षा अधिक नसावे.

३. अभ्यासक्रमाच्या मध्यावधी कालावधीत प्रवेश घेतलेला विद्यार्थी ही स्वयंम योजनेंतर्गत लाभास पात्र असेल.

४. शिक्षणात खंड पडलेला विद्यार्थी स्वयंम योजनेंतर्गत लाभास पात्र असेल. तथापि, सदर विद्यार्थी योजनेंतर्गत निश्चित केलेल्या वयोमर्यादेपेक्षा अधिक वयाचा नसावा.

५. सदर योजनेस पात्र विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास, अनुत्तीर्ण कालावधीमध्ये योजनेंतर्गत लाभ देण्यात येणार नाही. उत्तीर्ण झाल्यानंतर असा विद्यार्थी लाभास पुढे पात्र राहील. तथापि, उपरोक्त ५ वर्षाचा कालावधी विचारात घेताना उत्तीर्ण व अनुत्तीर्ण असे दोन्ही कालावधींची गणना करण्यात येईल.

६. सदर योजनेतंर्गत, प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विदयार्थ्यांना, व्दितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विदयार्थ्यांना, तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विदयार्थ्यांना व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विदयार्थ्यांना अशा रितीने प्रति जिल्हा ६०० विदयार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. तदनंतर, व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात रिक्त असलेल्या जागांवर प्रवेश देय राहिल. ज्या पदविका अभ्यासक्रम उर्तीर्ण विदयार्थ्यास पदवी अभ्यासक्रमाच्या व्दितीय वर्षास प्रवेश देय आहे त्याच पदवी अभ्यासक्रमास व्दितीय वर्षाकरिता प्रवेश देय राहील.उर्वरित सर्व पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्षात प्रवेश देय राहील.त्यासाठी त्या-त्या वेळी स्वतंत्रपणे जिल्हा सहायक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण यांचेकडे सोबत जोडलेल्या विहित विवरणपत्रात प्रवेशासाठी अर्ज करावा लागेल.

७. विद्यार्थ्यास इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या, आदिवासी विकास विभागाच्या, सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतीगृहामध्ये मोफत प्रवेश मिळालेला नसावा. तसेच, ज्या विद्यार्थ्यास इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या आधार योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे त्यास इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या स्वयंम योजनेचा लाभ अनुज्ञेय नसेल.

८. विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा.

९. सदर योजनेंतर्गत महिलांसाठी ३० टक्के समांतर आरक्षण किंवा शासन वेळोवेळी निर्धारित करेल त्याप्रमाणे आरक्षण अनुज्ञेय असेल.

१०. विद्यार्थी व शैक्षणिक संस्थांनी सदर योजनेमध्ये फसवणूक केल्याचे आढळल्यास संबंधित विद्यार्थी व शैक्षणिक संस्था कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या विद्यार्थ्याने शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न करता लाभ घेणे, शिक्षण न घेता नोकरी /व्यवसाय करुन या योजनेचा लाभ घेऊन गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यावर देखील असा विद्यार्थी कारवाईस पात्र राहील व दिलेल्या रकमेची व्याजासह वसुली करण्यात येईल.

११. या योजनेमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ४% आरक्षण किंवा शासन वेळोवेळी निर्धारित करेल त्याप्रमाणे असेल, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तेची किमान टक्केवारीची मर्यादा ५०% इतकी राहील, व यासाठी त्यांची स्वतंत्र गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

३) **योजनेचा लाभ मिळण्यासाठी आवश्यक कागदपत्रे:-**

१. भाडयाने राहत असल्याबाबत व स्थानिक रहिवासी नसल्याचे प्रतिज्ञापत्र (नोटरी)
२. स्वयंघोषणापत्र (दिलेली माहिती खरी व अचुक असल्याबाबत)
३. कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र
४. भाडयाने राहत असल्याबाबतचे भाडे चिठ्ठी व भाडेपत्र करारपत्र.

५. महाविदयालयात प्रवेश घेतल्याचा पुरावा .
६. वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज केला असल्याचा पुरावा (वसतिगृहाच्या गृहपालांच्या साक्षांकित प्रतीसह)

**४) निवड प्रकिया :-**

- सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विदयार्थ्यांनी संबंधित जिल्हयातील सहायक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण यांचेकडे ऑनलाईन/ऑफलाईन स्वरुपात अर्ज सादर करावेत.
- सहायक संचालक हे अर्जाची छाननी करतील आणि पात्र लाभार्थ्यांना जवळचे मागासवर्गीय मुला/मुलींचे वसतिगृहाचे गृहपाल यांचेशी संलग्न (attach )करतील.
- पात्र लाभार्थ्यांचे अर्ज संबंधीत सहायक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण यांनी संचालक, इतर मागास बहूजन कल्याण संचालनालय, म.रा.पुणे यांच्याकडे विद्यार्थ्यांना अनुदान वितरणासाठी Forward करावेत.
- संचालक, इतर मागास बहूजन कल्याण संचालनालय,पुणे यांनी पात्र विद्यार्थ्यांना अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

**५) अनुदान वितरण:-**

सदर योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे अनुदान वितरण करण्यात यावे :-

योजनेंतर्गत अनुज्ञेय असलेली भोजन, निवास व निर्वाहभत्त्याची रक्कम पात्र लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात संचालक स्तरावरील मध्यवर्ती खात्यामधून आगाऊ जमा करण्यात यावी.

सदरहू योजनेकरिता पात्र लाभार्थ्यांना लाभ वितरित करण्याकरिता खालील तक्यात नमूदप्रमाणे वेळापत्रक ठरविण्यात येत आहे –

| हप्ता | त्रैमासिक कालावधी | रक्कम जमा करण्याचा कालावधी |
|---|---|---|
| पहिला हप्ता | माहे जून ते माहे ऑगस्ट | ज्या दिवशी विदयार्थ्याचा /विदयार्थिनीचा ऑनलाईन अर्ज मंजूर होईल, त्यानंतर ७ दिवसामध्ये. |
| दुसरा हप्ता | माहे सप्टेंबर ते माहे नोव्हेंबर | माहे ऑगस्टचा दुसरा आठवडा |
| तिसरा हप्ता | माहे डिसेंबर ते माहे फेब्रुवारी | माहे नोव्हेंबरचा दुसरा आठवडा |
| चौथा हप्ता | माहे मार्च ते माहे मे | माहे फेब्रुवारीचा दुसरा आठवडा |

- ✓ उक्त तक्यात नमुद वेळापत्रक हे जरी १२ महिन्यांचा कालावधी दर्शवित असले तरी, प्रस्तूत योजनेतर्गत पात्र लाभार्थ्यास एका शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांचा कालावधीसाठी लाभ अनुज्ञेय राहील. सदर १० महिन्यांचा लाभ निश्चित करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हयाचे सहायक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण यांची राहील. तथापि, लाभाची रक्कम जमा करताना प्रत्येक तिमाहीमध्ये देय असलेली अनुज्ञेय रक्कम संबंधित विदयार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. विदयार्थ्यांच्या बँक खात्याशी त्यांचा आधार कार्ड क्रमांक संलग्न करण्यात येईल.
- ✓ या योजनेत लाभास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांस इतर कोणताही भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
- ✓ विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती किमान ७५ % असणे आवश्यक राहील, याबाबत संबंधित संस्थेकडून प्रत्येक तिमाहीस उपस्थितीबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
- ✓ विद्यार्थ्याने प्रत्येक सत्र परिक्षेचा निकाल १५ दिवसाचे आत देणे बंधनकारक राहील.

६) **संनियंत्रण :-**

- सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी सहायक संचालक, इतर मागास बहूजन कल्याण हे जबाबदार राहतील तसेच संबंधित जिल्हयातील वसतिगृहाचे गृहपाल यांचे संनियंत्रण राहील. सदर योजनेची राज्यस्तरावरील लाभार्थ्यांची यादी अंतिम करण्याची जबाबदारी संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे यांची राहील.
- विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ संबंधित अभ्यासक्रमाच्या कालावधीपर्यंतच देय असेल. (उदा. इंजिनिअरींग अभ्यासक्रम कालावधी ४ वर्षे असल्यास त्यास ४ वर्षेच लाभ मिळेल) विद्यार्थ्याने खोटी माहिती व कागदपत्रे देवून लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास किंवा शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास अथवा नोकरी व व्यवसाय करत असल्यास आणि इतर मार्गाने या योजनेचा लाभ घेवून गैरवापर केल्याचे निदर्शनास आल्यास तो कारवाईस पात्र राहील. तसेच त्यास दिलेल्या रकमेची १२% व्याजासह वसुली केली जाईल.
- सदर योजनेसाठी पात्र ठरलेल्या ज्या विदयार्थ्यांना पदवी/पदव्युत्तर पदवी हे शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करताना एटीकेटी प्राप्त झाली त्या विदयार्थ्यांला फक्त एकदाच या अटीतून सुट देण्यात येईल. (म्हणजेच एखादया विदयार्थ्यांस दुसऱ्यावेळी एटीकेटी मिळाल्यास तो सदर योजनेचा पुढील लाभ घेण्यास अपात्र ठरेल.
- विद्यार्थ्याने संबंधित शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतल्यानंतर सदर योजनेअंर्गत अनुज्ञेय रक्कमेपैकी पहिल्या तिमाहीची रक्कम आगावू देण्यात येईल व त्यानंतर शैक्षणिक संस्थेच्या प्रत्येक तिमाहीची हजेरी ७५ % पेक्षा जास्त असल्याचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर उर्वरीत तिमाहीची रक्कम अदा केली जाईल. ही अदा करण्यात येणारी रक्कम आधार संलग्न बॅक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.
- सर्व प्रादेशिक उप संचालक (इतर मागास बहूजन कल्याण ) हे त्यांच्या अधिनस्त प्रादेशिक विभागातील सर्व जिल्हयाच्या सहायक संचालक, (इतर मागास बहूजन कल्याण) यांच्या सहाय्याने सदर योजनेचा मासिक आढावा घेतील.
- सदर योजनेचे अटी व शर्ती वेळोवेळी आवश्यक वाटल्यास सुधारीत करण्याचे अधिकार शासनास राहतील.

७) भटक्या जमाती- क प्रवर्गातील धनगर समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विदयार्थ्यांसाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंम योजना ही योजना राबविल्यामुळे शाश्वत विकास ध्येय क्र.२,४,१० मधील लक्ष्य क्र.२.१, ४.१ व १०.०२ साध्य करण्यास हातभार लागणार आहे.

८) सदर योजनेच्या अंमलबजाणीसाठी होणारा खर्च -मागणी क्र. झेडजी-३, २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गीयांचे कल्याण, २७७,शिक्षण, ०२, शिष्यवृत्त्या विद्यावेतन, (०२) (२३) वसतिगृह योजनेपासून वंचित असलेल्या धनगर समाजाच्या विदयार्थ्याकरिता स्वयंम योजना (कार्यक्रम)(२२२५ एफ ४१४) ३४, शिष्यवृत्त्या/विदयावेतने◦ या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या निधीतून करण्यात यावा.

९) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०६२११७२२३५३६३४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DINESH ROHIDAS CHAVAN

Digitally signed by DINESH ROHIDAS CHAVAN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=OTHER BACKWARD BAHUJAN WELFARE DEPARTMENT, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C2377ED235498603821D49922A210871FF6FB9B369722AC707AEE7DCD87F2BD, cn=DINESH ROHIDAS CHAVAN
Date: 2024.06.21 17:36:30 +05'30'

**( दिनेश चव्हाण )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन,मलबार हिल मुंबई.
२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव
४. मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद / विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. उपमुख्यमंत्री (गृह व विधी) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा. मंत्री, इतर मागास बहूजन कल्याण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मा. मंत्री/राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
१०. सर्व सन्माननीय सदस्य विधान परिषद / विधान सभा, विधानभवन, मुंबई.
११. मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक
१३. प्रधान सचिव,माहिती व तंत्रज्ञान,मंत्रालय,मुंबई.
१४. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई
१५. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. सर्व सह सचिव/उप सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
१९. संचालक,इतर मागास बहूजन कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, पुणे
२०. सर्व प्रादेशिक उप संचालक, इतर मागास बहूजन कल्याण (प्रादेशिक ) विभाग
२१. सर्व सहायक संचालक,इतर मागास बहूजन कल्याण, इतर मागास बहूजन कल्याण विभाग
२२. निवड नस्ती